**असुधारित प्रत**

# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## मंगळवार, दिनांक २ मार्च, २०२१

## ( सकाळी ११.०० वाजता )

**एक : प्रश्नोत्तरे.**

(अ) तारांकित प्रश्न.

(ब) अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक ४२ ते ४७ सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**(१) मुख्यमंत्री** : श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(२) उद्योग मंत्री** : महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा छपन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(३) नगरविकास मंत्री** : (क) महाराष्ट्र मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित (महामेट्रो) यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) मुंबई रेल्वे विकास महामंडळ (मर्या.) मुंबई यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ग) मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(घ) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचा सन २०१६-२०१७ व २०१८-२०१९ या वर्षांचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ङ) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षण पुनर्विलोकन (तृतीय) अहवाल २०१३-२०१४ सभागृहासमोर ठेवतील.

**(४) रोजगार हमी मंत्री** : महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र व राज्य रोजगार हमी योजना या योजनांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(५) संसदीय कार्य मंत्री** : विधानसभेच्या सन २०२० च्या चौथ्या (हिवाळी) अधिवेशनात दिनांक १४ डिसेंबर, २०२० ते दिनांक १५ डिसेंबर, २०२० या कालावधीत मा.मंत्री/मा.राज्यमंत्री महोदयांनी विधानसभा सभागृहात दिलेल्या एकूण २२ आश्वासनांची यादी तसेच, सन २०२० चे चौथे (हिवाळी) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर, आतापर्यंत पूर्तता करण्यात आलेल्या एकूण २१२ आश्वासनांच्या पूर्ततेची विवरणपत्रे यादीसह सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**चार : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा (पहिला दिवस).**

**पाच : शासकीय विधेयके :**

**पुर:स्थापनार्थ :-**

**(१)** सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ — महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२१.

**(२)** सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ — महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) (सुधारणा) विधेयक, २०२१.

**सहा : सर्वश्री सुनिल प्रभू, अनिल पाटील, सुरेश वरपुडकर, अजय चौधरी, प्रकाश सोळंके, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री प्रताप सरनाईक, दिपक चव्हाण, अमित झनक, राजन साळवी, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री अमीन पटेल, अनिल बाबर, ॲड अशोक पवार, सर्वश्री संग्राम थोपटे, चिमणराव पाटील, दिलीप बनकर, कैलास गोरंटयाल, संजय शिरसाट, रोहित पवार, कुणाल पाटील, डॉ. राहूल पाटील, सर्वश्री संदिप क्षीरसागर, सुभाष धोटे, संजय रायमूलकर, शेखर निकम, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री सुनिल शेळके, माधवराव जवळगावकर-पाटील, दौलत दरोडा, रावसाहेब अंतापुरकर, ॲड. माणिकराव कोकाटे, सर्वश्री पी.एन. पाटील (सडोलीकर), शिरीषकुमार नाईक, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री हिरामण खोसकर, संजय जगताप, विक्रमसिंह सावंत, धिरज देशमुख, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"राज्यात सन २०१९ मध्ये सरकार स्थापन झाल्यानंतर, "कोरोना" नामक महासंकट उभे राहिले, या संकटावर मात करण्याकरिता शासनाने वैद्यकिय व तांत्रिक सहाय्य करण्यासाठी वरिष्ठ डॉक्टरांचे राज्य कृती दल स्थापन करुन पुरेशा चाचणी प्रयोगशाळा, विशाल (जंबो) रुग्णालये (कोविड सेंटर) स्थापन करुन तसेच राज्यातील नागरिकांना शिस्त व नियमांचे पालन करण्याचे आवाहन करुन या रोगावर यशस्वीपणे मात केलेली असतांना शासनाने राज्याच्या विकासाच्या दृष्टीने अनेक निर्णय घेतले, अर्थव्यवस्थेचा प्रमुख घटक म्हणजे शेतकरी यांच्या उन्नतीकरिता स्मार्ट कृषि प्रकल्प उभारण्याकरिता उपसमिती गठीत करणे, शेतकरी संघटना आणि शासन चर्चेसाठी प्रथमच व्यासपीठाची उपलब्धता, शेतकरी सन्मान व मार्गदर्शन कक्षाची स्थापना, शेतमजूरांना कौशल्य विकास आधारित प्रशिक्षण, कोरोनामुळे बाजारात पिशवीबंद दुधाच्या मागणीत घट झाल्याने दूध उत्पादकांना याचा फटका बसू नये याकरिता दुध भुकटी पॅकिंग करुन अमृत आहार योजनेअंतर्गत वाटप, टाळेबंदीच्या कालावधीत मासे, मत्स्यबीज व मस्त्यखाद्याचा समावेश अत्यावश्यक बाबीमध्ये करुन वाहतूकीस परवानगी, कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठा विभागांतर्गत स्वच्छाग्रहीच्या नियुक्तीस एक वर्षाची मुदतवाढ, शाळा बंद ... पण शिक्षण या अंतर्गत "दीक्षा ॲप आधारित विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन, गुगलच्या सहकार्याने गुगल क्लासरुम उपक्रम राबविणारे देशातील पहिले राज्य, उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मनातील राष्ट्रीय भावना जागृत ठेवण्याच्या दृष्टीने विद्यापीठ आणि महाविद्यालयाची दैनंदिन सुरुवात राष्ट्रगीताने करण्याचा निर्णय, "मराठी भाषा गौरव दिन" महाविद्यालयांमध्ये साजरा करण्याचा निर्णय, ग्रंथालयांची नव्याने पडताळणी करण्याचा निर्णय, संशोधन, प्रशिक्षण व कौशल्य विकास यामधील गुणवत्ता निर्माण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिडा विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय, टाळेबंदीच्या काळात अडकलेल्या आदिवासी मजूरांना मूळ गावी पाठविण्यासाठी घेतलेला पुढाकार, राज्यातील ६५ हजार उद्योगांना टाळेबंदीनंतर परवानगी, तसेच १६ लाख कामगारांना कामावर रूजू करुन घेणे, महाजॉब्स पोर्टल आणि ॲप सुरु, स्थलांतरीत बेघर कामगारांना

सुविधा देण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना आपत्ती व्यवस्थापन करण्यास मान्यता, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगारांना दोन हजार रुपयांचे आर्थिक सहाय्य, राज्यातील ज्या शेतकऱ्यांनी वेळेत कर्ज भरले आहेत त्यांना तीन लाखपर्यंत कर्ज विनाव्याज देण्याचा शासनाने निर्णय घेतलेला असणे, यासारखे अनेक महत्वाचे निर्णय घेऊन कोरोना काळातही राज्याची आर्थिक स्थिती, वैद्यकिय स्थिती आणि सुव्यवस्था यांचा योग्य समतोल राखण्याकरिता राज्य शासनाने वेळोवेळी घेतलेले योग्य निर्णय व त्यांची ठोसपणे केलेली अंमलबजावणी, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही विचारात घेण्यात यावी."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १ मार्च, २०२१

**राजेन्द्र भागवत,**
सचिव,
महाराष्ट्र विधानसभा